बुलडाणा ◆ वर्ष - १ ◆ अंक -117 ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम केळवदकर - 9403478540


दैनिक शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

**TRENDING NEWS**

कंगनांचा काँग्रेसवर निशाणा:म्हटले- मला तिकीट मिळालं, तेव्हा यांच्या प्रवक्त्याने माझ्यासाठी लिहिलं, मंडीत काय भाव चालू आहे

पान 3 वर



**# SHORT NEWS**

### तरुणावर प्राणघातक हल्ला

**यवतमाळ :** येथील बसस्थानक क्रमांक १ च्या गेटजवळ एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. फिर्यादी ओम उर्वते हा गावाला जाण्यासाठी बसस्थानकावर आला असता, त्याचा मित्र कुणाल सहारे आणि आरोपी शाहू व मंथन यांच्यात वाद सुरू होता. हा वाद सोडवण्यासाठी ओम मध्यस्थी करण्यासाठी गेला असता, आरोपींनी संतापून "तुला भांडणात जास्त रस आहे का?" असे म्हणून चाकूने त्याच्या छातीवर वार केला. ओमने जीव वाचवण्यासाठी पळण्याचा प्रयत्न केला, पण आरोपींनी पुन्हा त्याच्या कमरेवर चाकू मारून त्याला गंभीर जखमी केले. अवधूतवाडी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे

### दगडफेक

**यवतमाळ शहर :** शेतात मोटार चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या इसमांनी विचारपूस केली असता शेतकऱ्यावर दगडफेक केल्याची घटना डोर्ली शेतशिवारात घडली. २६ फेब्रुवारी रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादी प्रितम भास्कर नागरगोजे (३२) यांनी शेतात आलेल्या दोन संशयितांची चौकशी केली. यावेळी आरोपी क्रमांक २ तिथून पळून गेला, तर आरोपी प्रकाश वसंतराव इंदुरकर (२०, रा. खानगाव) याने प्रितम यांना दगड मारून कपाळावर व नाकावर जखमी केले. शेजारील शेतकरी मदतीला धावून आले असता आरोपीने आपण 'पाणी पिण्यासाठी आलो होतो' अशी बतावणी केली. यवतमाळ शहर पोलिसांनी याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### सुझुकी चोरीला

**वाढदिवस**

**लोहारा :** यवतमाळ येथील दारव्हा रोडवरील टीव्हीएस शोरूम परिसरातून अज्ञात चोरट्याने एक महागडी दुचाकी लंपास केली. ही चोरी १७ ते २२ फेब्रुवारी २०२६ च्या दरम्यान घडली असून २७ फेब्रुवारी रोजी याची पोलिसांत नोंद करण्यात आली. फिर्यादी बंटी देवराव थोरात (४०, रा. नेताजी नगर, यवतमाळ) यांची सुझुकी ॲक्सेस १२५ मोटारसायकल (क्रमांक एमएच २९ सीडी ९०८९) अज्ञात आरोपीने शिताफीने चोरून नेली. चोरीला गेलेल्या या दुचाकीची किंमत ५० हजार रुपये आहे.

### केबलची चोरी

**जंगल वडगाव:** वरुड शिवारातील धरणावर शेतकऱ्यांनी सिंचनासाठी बसवलेल्या कृषी पंपाच्या कॉपर केबल अज्ञात चोरट्यांनी कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी १ ते २ फेब्रुवारीच्या मध्यरात्री दरम्यान घडली. विष्णू सोनबा काटपेल्लवार (६२, रा. जवळा) आणि इतर शेजारील शेतकऱ्यांच्या शेतातील सुमारे १५२० फूट लांबीची कॉपर केबल चोरट्यांनी लंपास केली. चोरीला गेलेल्या मालाची एकूण किंमत ६७,९५० रुपये आहे. याप्रकरणी २ फेब्रुवारी रोजी जंगल वडगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला

---

✦ जूर होण्यासाठी 352 मते पाहिजे होती, 298 मिळाली

# महिला आरक्षणाशी संबंधित विधेयक 54 मतांनी पडले

बातमी जगत | प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** महिला आरक्षण विधेयकाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर करून घेण्यात सरकारला अपयश आले. '१३१ वे घटनादुरुस्ती विधेयक, २०२६' मध्ये एकूण जागांची संख्या वाढवून ८५० करण्याच्या तरतुदींचा समावेश होता.

२१ तास चाललेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर या विधेयकावर मतदान झाले. विधेयकाच्या बाजूने २९८, तर विरोधात २३० मते पडली. लोकसभेत एकूण ५२८ संसद सदस्यांनी (खासदारांनी) आपला मतदानाचा हक्क बजावला. विधेयक मंजूर होण्यासाठी



दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. ५२८ च्या दोन-तृतीयांश म्हणजे ३५२ मते होय. परिणामी, ५४ मतांच्या फरकाने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. या विधेयकांवर स्वतंत्र मतदान घेण्यास सरकारने नकार दिला. ही विधेयके मुख्य विधेयकाशीच संलग्न असल्याने, त्यांच्यावर स्वतंत्र मतदानाची आवश्यकता



नसल्याचे कारण सरकारने दिले. आपल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात, मोदी सरकारला सभागृहात एखादे विधेयक मंजूर करून घेण्यात अपयश येण्याची ही पहिलीच वेळ आहे. मतदानापूर्वी अमित शाह यांनी एक तासाचे भाषण दिले. या विधेयकांना मंजुरी मिळाली नाही, तर त्यासाठी विरोधी पक्षच जबाबदार असेल, असा दावा त्यांनी केला. देशातील महिला हे पाहत आहेत की, त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करण्याचे काम कोण करत आहे, अशी टिप्पणीही त्यांनी केली. १७ एप्रिल रोजी लोकसभेत बोलताना अमित शहा यांनी स्पष्ट केले की, या देशातील महिला हे बारकाईने पाहत आहेत की, त्यांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळा निर्माण करणारे कोण आहेत. "येथे गोंधळ घालून कदाचित तुम्ही सहीसलामत निसटाल; परंतु आमच्या माता-भगिनींचा संताप तुम्हाला बाहेर नक्कीच अनुभवावा लागेल. जेव्हा तुम्ही निवडणुकीच्या काळात मते मागण्यासाठी जाल, तेव्हा स्त्रीशक्तीची सामूहिक ताकद तुमच्याकडे हिशोब मागेल."

---

## वरवणे विद्यालयाचे कर्मचारी पांडुरंग तोंडिलकर सेवानिवृत्त



बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

**पेण :** तालुक्यातील श्रीमती सुभद्राबाई महादेव पाटील माध्यमिक विद्यालय, वरवणे येथील कर्मचारी पांडुरंग हरिभाऊ तोंडिलकर यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाला. सलग २६ वर्षे प्रामाणिक सेवा बजावल्यानंतर ते सेवानिवृत्त झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

पांडुरंग तोंडिलकर हे १९९९ मध्ये विद्यालयात रुजू झाले होते. सुरुवातीची ८ वर्षे त्यांनी विनावेतन सेवा दिली. रस्ता, वीज आणि पाणी यांसारख्या सुविधा नसतानाही त्यांनी अत्यंत कष्टाने आपली जबाबदारी पार पाडली. मनमिळावू स्वभाव आणि कार्यतत्परतेमुळे त्यांनी सर्वांची मने जिंकली. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या क्षणी सहकारी शिक्षक व कर्मचारी भावूक झाले होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भाऊ येरणकर, पंचक्रोशी अध्यक्ष प्रदीप पाटील, मुख्याध्यापक ए. बी. पाटील, माजी सरपंच संदीप तोंडिलकर, सरपंच देहू वाघमारे, पोलीस पाटील राजू पाटील, भगवान वेदपाठक यांच्यासह मान्यवर, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी तोंडिलकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सचिन धनावडे यांनी केले.

---

## शिंदीत विना पोलीस बंदोबस्त 'भीम जयंती' उत्साहात; ग्रामस्थांचा आदर्श

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**सा.खेर्डा :** सिंदखेडराजा तालुक्यातील शिंदी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत शांततेत आणि उत्साहात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे, कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस बंदोबस्ताची गरज भासू न देता, शिंदीतील नागरिकांनी आदर्श मिरवणूक काढून एकोप्याचे दर्शन घडवले.

सकाळी सरपंच सौ. साधनाताई खरात यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी अनंत



इंगळे, उपसरपंच वैशालीताई खरात व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम कवायत सादर केली, तर पंजाबराव मोरे यांनी भीमगीते सादर केली. कडुबा खंडारे यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

सायंकाळी सजवलेल्या ट्रॅक्टरवरून काढण्यात आलेली भव्य मिरवणूक हे प्रमुख आकर्षण ठरले. महिला व मुलींनी लेझीम खेळून आनंद व्यक्त केला. गावातून काढण्यात आलेली ही मिरवणूक पुन्हा पुतळ्याजवळ विनावादाविना विसर्जित झाली. या आदर्श उपक्रमाबद्दल शिंदीतील भीमसैनिकांचे जिल्ह्यात कौतुक होत आहे. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशवंता खंडारे यांच्यासह सचिन खंडारे, सुनील खंडारे व सर्व कार्यकर्त्यांनी मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. त्रिशरण पंचशील घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

## बुलडाणा बसस्थानकावर माता भिमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन; जयंतीच्या पूर्वसंध्येला अनोखा उपक्रम

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ गजानन दसरकर

**बुलडाणा :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला बुलडाणा बसस्थानक परिसरात माता भिमाई आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्याचा सोहळा उत्साहात पार पडला. जन्मदात्री माता भिमाईचा आदर व्हावा, या संकल्पनेतून रिपाइं (आठवले गट) जिल्हा संपर्क प्रमुख व पत्रकार बाबासाहेब जाधव यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी




दीपप्रज्वलन, पुष्पहार अर्पण आणि फटाक्यांची आतषबाजी करत महामानवाचा जयघोष केला. त्रिशरण पंचशील घेऊन माता भिमाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाला मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष राजेंद्र काळे, जिल्हाध्यक्ष रणजितसिंग राजपूत, ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुभाष लहाणे, स्थानक प्रमुख कृष्णाजी पवार, प्रा. भैयासाहेब पाटील, डॉ. मंजूताई गौतम, वैशालीताई राजपूत, लक्ष्मीताई बंड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयोजक बाबासाहेब जाधव यांनी डॉ. आंबेडकरांच्या अलौकिक कार्याचा गौरव केला. "आज आपण जो स्वाभिमानाचा श्वास घेतोय, ती बाबासाहेबांची देण आहे. बसस्थानकावर महापुरुषांच्या प्रतिमा लावताना मला संघर्ष करावा लागला, मात्र महापुरुषांच्या विचारांसाठी केलेला त्याग आयुष्याला वैभव प्राप्त करून देतो," असे जाधव यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरंजन जाधव यांनी केले. या अनोख्या उपक्रमाचे प्रवाशांनी आणि नागरिकांनी कौतुक केले आहे.

---

## गुरू रविदास सामाजिक भवन येथे महात्मा फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती संपन्न

बातमी जगत | प्रतिनिधी

**बुलढाणा :** बुलढाणा शहरातील चर्मकार समाज बांधवांसाठी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्नडॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त सुभेदार शंकरराव सोनूने हे होते प्रमुख अतिथी शाहीर के ओ बावस्कर, मुंबई पोलीस नरेश शिराळे सेवानिवृत्त वित्त लेखाधिकारी रामदास माठे हे होते महापुरुषांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात सेवानिवृत्त संवर्ग विकास अधिकारी भीमसेन शिराळे यांनी कार्यक्रमाची भूमिका मांडताना भारतातील शोषित व शोषकांचा लढा उलगडला. बी . एस . खरात यांनी सध्या गाजत असलेला अनुसूचित जातीच्या वर्गीकरणाचा विषय समाजामध्ये फूट पाडणारा असून समाजाने याबद्दल विरोधाची भूमिका



घेतली पाहिजे असे विचार मांडले, सेवानिवृत्त प्रशासन अधिकारी रामभाऊ बशरे यांनी महापुरुषांचे विचार समाजाने आत्मसात करून सामाजिक शैक्षणिक व आर्थिक उन्नती साधली पाहिजे असे विचार मांडले. बारा बलुतेदार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष दामोदर बिडवे यांनी चर्मकार समाजाचे कौतुक करून सर्व महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिन हा समाज साजरा करून सामाजिक प्रबोधनाचे फार मोठे कार्य करत असल्याचे सांगितले के.ओ.बावस्कर महात्मा फुले व बाबासाहेब यांच्या जीवनावर पोवाड्याचे माध्यमाने प्रकाश टाकला कार्यक्रमाचे अध्यक्ष सोनुने यांनी समाजाने महापुरुषांचे विचार स्वीकारून प्रगती करावी असे आवाहन केले. प्रशांत सोनुने यांनी महापुरुषांचे विचार आजच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीत खूपच मार्गदर्शक असल्याचे सांगितले प्रा .डी.आर. माळी यांनी फुले आंबेडकरांचा विचार हाच समाजाला तारणारा विचारा विचविचारा भोंदू गुरु अशोक खरात पासून हाच विचार समाजाला अलिप्त ठेवू शकतो कारण महापुरुषांचा विचार वैज्ञानिक दृष्टिकोन देणारा विचार आहे तो स्वीकारणे म्हणजेच खऱ्या अर्थाने महापुरुषांची जयंती साजरी करणे होय असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त उप प्राचार्य आत्माराम चांदोरे यांनी केले या कार्यक्रमाला रामधन पसरते,एस.एस. शेगोकार, भालचंद मगरे, आर. एस. गव्हाळे, सौ . लक्ष्मी ताई गव्हाळे, आदित्य शिराळे, सौरभ मगरे, विनोद बिबे, शालिग्राम गवई, अरुण मांडवे, समाधान माळी, भगवान मांडवे, भिकाजी जोहरे, शिवाजीराव पठ्ठे, सुरेश बिबे, जयराम जोरेवार, गोपाल दास काकडे, सखाराम लहाने, गिरीश सरसांडे, गजानन चौधरी, गणेश खांसारे, डॉक्टर बबन परमेश्वर, सुरेश कावळे, भावलाल बिबे, शिवलाल शिकणे यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

---

## एका आठवड्यात दोन बालकांना मिळाले जीवनदान; विद्याविश्व हॉस्पिटलच्या उल्लेखनीय

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत

**बुलढाणा :** देव्हारी व सातगाव परिसरातील दोन गंभीर अपघातग्रस्त बालकांचे प्राण वाचवण्यात विद्याविश्व हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी मोठे यश मिळवले आहे. अवघ्या सात दिवसांच्या कालावधीत झालेल्या या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये तातडीने शस्त्रक्रिया करून बालकांना नवजीवन देण्यात आले.

पहिली घटना देव्हारी येथील १० वर्षीय बालकाशी संबंधित आहे. या बालकाच्या पोटावरून वाहन गेल्याने त्याच्या प्लीहेला गंभीर इजा झाली होती. मोठ्या प्रमाणात, सुमारे १.५ लीटर रक्तस्राव झाल्याने परिस्थिती



अत्यंत गंभीर होती. अशा वेळी तात्काळ शस्त्रक्रिया करून आणि आवश्यक रक्तपुरवठा करून डॉक्टरांनी या बालकाचे प्राण वाचवले.

दुसरी घटना सातगाव येथील ८ वर्षीय बालकाची आहे. ट्रॅक्टरच्या धडकेत त्याच्या लिव्हरला मार लागून अंतर्गत रक्तस्राव सुरू झाला होता. या बालकावरही तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली आणि रक्तस्राव थांबवून त्याचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. या दोन्ही शस्त्रक्रिया विद्याविश्व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिलाष माळी यांच्या नेतृत्वाखाली पार पडल्या. तसेच एनेस्थेटिस्ट म्हणून डॉ. माधुरी गडाख, डॉ. लविश गायकवाड आणि डॉ. तायडे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.तर पीडियाट्रिशियन म्हणून - डॉ शैलेश गडाख,ही होते तर सहाय्यक म्हणून गोपाल खरात , दत्ता उफाळे.या यशस्वी उपचारांमुळे परिसरात समाधानाचे वातावरण असून डॉक्टरांच्या तत्परतेचे आणि कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

✦ किल्ल्याच्या पुनरुज्जीवनासाठी शासन स्तरावरून भरीव निधी उपलब्ध करून देणार - सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले

# छत्रपती शिवाजी महाराज व महाराणी गुणवंताबाई विवाह सोहळा उत्साहात संपन्न

बातमी जगत | प्रतिनिधी

**बुलढाणा :** स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी गुणवंताबाई साहेब यांच्या ऐतिहासिक विवाह सोहळ्याला ३७० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, करवंड येथे प्रथमच 'ऐतिहासिक करवंड महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या माध्यमातून इतिहासाला उजाळा मिळण्यासोबतच, किल्ले व बुरुजाचे संवर्धनासाठी आणि भव्य स्मारक उभारण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली.

सांस्कृतिक कार्य विभाग,



जिल्हाधिकारी कार्यालय व करवंड महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऐतिहासिक करवंड महोत्सवा'चे आयोजन चिखली तालुक्यातल करवंड येथे करण्यात आले होते. यावेळी विधान परिषद आमदार धिरज लिंगाडे, विधानसभा आमदार श्वेता महाले, संजय गायकवाड, सिद्धार्थ खरात, मनोज यदे,



मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक विद्याधर महाले, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, राजेंद्र पोळ, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, अनिकेत निंबाळकर आयोजन समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. १५ एप्रिल



१६५७ रोजी झालेल्या या ऐतिहासिक विवाहाचे स्मरण म्हणून आयोजित या कार्यक्रमात बोलताना शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी गुणवंताबाई यांचा विवाह सोहळा केवळ एक कौटुंबिक प्रसंग नसून स्वराज्याच्या उभारणीतील एक महत्त्वाचा दुवा आहे. या भूमीला ऐतिहासिक महत्त्व असून, येथील पडझड झालेल्या बुरुजांचे पुनरुज्जीवन करणे आणि राजवाड्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे. करवंड येथील ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून विशेष प्रकल्प मंजूर करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने महाराणी गुणवंताबाई यांचा भव्य पुतळा उभारणे, ऐतिहासिक राजवाड्याची डागडुजी करणे आणि पर्यटनाच्या दृष्टीने या परिसराचा विकास करणे, या कामांना प्राधान्य दिला जाईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. हा महोत्सव आणि स्मारकाचे काम केवळ शासन किंवा प्रशासनाचे नसून, यामध्ये स्थानिक ग्रामस्थ आणि सर्व शिवप्रेमींचा सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय परवानग्या मिळवण्यासाठी ग्रामपंचायत व स्थानिकांनी सहकार्य करावे, जेणेकरून पुढच्या वर्षी हा सोहळा अधिक भव्य स्वरूपात साजरा करता येईल, असे आवाहनही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी याप्रसंगी केले. आमदार श्वेता महाले यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, करवंड महोत्सवाचा प्रस्ताव कृती समितीने मांडल्यानंतर सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी तात्काळ पुढाकार घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष प्रयत्नांमुळेच हा सोहळा इतक्या भव्य स्वरूपात साकार झाला आहे. या प्रसंगी परिसरातील वाहतुकीच्या समस्यांकडेही मंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले. चिखली ते बुलढाणा दरम्यान मोठ्या प्रमाणावर होणारी वाहतूक कोंडी आणि पूर्वी २० मिनिटांत होणाऱ्या प्रवासाला आता लागणारा सव्वा तासाचा वेळ, यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची विनंती यावेळी करण्यात आली.






शाही विवाह! छत्रपती शिवराय आणि गुणवंतबाई यांच्या विवाह महोत्सवातील काही निवडक आणि मोहक क्षणचित्रे...

✦ जिल्हास्तरीय सोहळ्यात गुणवंतांचा गौरव

# सक्षम 'मधून विद्यार्थ्यांच्या उद्यमशीलतेला धुमारे

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** विद्यार्थ्यांमध्ये २१ व्या शतकातील कौशल्ये रुजविणाऱ्या आणि 'मी करू शकतो' हा आत्मविश्वास देणाऱ्या 'सक्षम' कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय गौरव सोहळा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षक आणि कल्पक विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

माध्यमिक शिक्षणाधिकारी आकाळ यांच्या हस्ते गुणवंतांना सन्मानित करण्यात आले. यावेळी 'डाएट'चे प्राचार्य, शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षण केवळ पुस्तकी न राहता ते व्यावहारिक असावे, या उद्देशाने जिल्ह्यात 'सक्षम' कार्यक्रम राबविला जात आहे. ३-पी (पीपल, प्लॅनेट, प्रॉफिट) या संकल्पनेतून विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशील मानसिकता विकसित करणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. नियोजनबद्ध अध्यापन आणि कृतीशील उपक्रमांमुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना आणि स्वावलंबनाची भावना निर्माण होत असल्याचे या सोहळ्यातून अधोरेखित झाले.

जिल्ह्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये एस. एन. लहाने (शिक्षिका) शिवाजी हायस्कूल, शेलसूर. पी. जी. निकम (शिक्षक)शिवाजी विद्यालय, भादोला. या दोघांनी विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलता विकसित करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत त्यांना 'शिक्षक गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी तयार केलेली उत्पादने. निसर्गाचा समतोल राखत विद्यार्थ्यांनी स्वहस्ते सुगंधित धूप, अगरबत्ती आणि नैसर्गिक सुरमा तयार केला. या उत्पादनांची गुणवत्ता आणि सादरीकरण पाहून उपस्थित मान्यवर थक्क झाले. या कल्पक प्रकल्पाला विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

> ✦ शिक्षणासोबतच कौशल्य विकास आणि उद्यमशील-तेचा संगम साधणे काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी भविष्यात स्वावलंबी आणि सक्षम नागरिक बनतील."
>
> ✦ आकाळ,
>
> ✦ शिक्षणाधिकारी (माध्यमिक
>
> ## बुलढाणेकरांसाठी प्रेरणादायी!
>
> ✦ सक्षम कार्यक्रमामुळे शिक्षणाला एक नवी कौशल्याधिष्ठित दिशा मिळाली आहे. सन्मानित शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या या यशामुळे जिल्ह्यातील इतर शाळांसमोर एक नवा आदर्श निर्माण झाला असून, सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# मेहकर महसूल विभागात लाचलुचपतचा 'धडाका'; २० हजारांची लाच घेताना सहाय्यक महसूल अधिकारी एसीबीच्या जाळ्यात!

## दोन दिवसात दुसरी मोठी कारवाई; भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले

बातमी जगत | प्रतिनिधी



**मेहकर :** मेहकर उपविभागीय अधिकारी कार्यालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. फेरफार रद्द आदेशाची मूळ नक्कल प्रत देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना सहाय्यक महसूल अधिकारी कैलास भगवान मुरकुट (४६) यांना वाशिम एसीबीने रंगेहात पकडले. गुरुवारी (दि. १६) करण्यात आलेल्या या धडक कारवाईमुळे महसूल वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

या प्रकरणातील तक्रारदार हे व्यवसायाने वकील आहेत. त्यांच्या पक्षकाराच्या जमिनीच्या फेरफार रद्द करण्यासंदर्भात उपविभागीय कार्यालयात अपील दाखल होते. या अपीलाचा निकाल २३ फेब्रुवारी २०२६ रोजी तक्रारदाराच्या बाजूने लागला होता. मात्र, या अंतिम आदेशाची मूळ प्रत आरोपी कैलास मुरकुट (प्रस्तुतकार-१) यांच्या ताब्यात होती. ही प्रत देण्यासाठी मुरकुट यांनी २० हजार रुपयांची मागणी केली. लाच देण्याची इच्छा नसल्याने वकिलाने थेट वाशिम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (ACB) धाव घेतली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर, १६ एप्रिल रोजी एसीबीच्या पथकाने मेहकर उपविभागीय कार्यालयात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे, मुरकुट यांनी आपल्या कक्षात लाचेची रक्कम स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्यांना झडप घालून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून लाचेचे २० हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, आदल्याच दिवशी घरकुल लाभार्थ्याकडून लाच घेणाऱ्या कंत्राटी अभियंत्यावर कारवाई झाली होती. त्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी ही दुसरी मोठी कारवाई झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. आरोपी कैलास मुरकुट यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी, नितीन टवलारकर, योगेश खोटे आणि मंगेश देवकाते यांनी केली.

# अक्षयतृतीयेला बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सतर्क; नियम मोडल्यास कडक कारवाईचा इशारा

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** अक्षयतृतीयेचा मुहूर्त अत्यंत शुभ मानला जात असला तरी या दिवशी छुप्या मार्गाने बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने सतर्कता वाढविली आहे. ग्रामीण व शहरी भागात १९ एप्रिल रोजी होणाऱ्या विवाह सोहळ्यांमध्ये बालविवाह होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.


भारतीय कायद्यानुसार मुलाचे किमान वय २१ वर्षे आणि मुलीचे १८ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत बेकायदेशीर ठरतो. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक तर शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील आणि अंगणवाडी सेविका यांनी विवाहापूर्वी वधू-वरांचे वय तपासून खात्री करावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

बालविवाह लावणे हा दखलपात्र गुन्हा असून, केवळ पालकच नव्हे तर विवाह सोहळ्यात सहभागी होणारे वऱ्हाडी, भटजी, वाजंत्री, मंगल कार्यालय चालक तसेच बिछायत केंद्र चालक यांच्यावरही गुन्हे दाखल होऊ शकतात. दोषींना २ वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. गावात किंवा परिसरात बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस विभागाच्या ११२ या टोल फ्री क्रमांकावर कळवावे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असे प्रशासनाने सांगितले आहे. जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, संशयास्पद विवाहांची माहिती तत्काळ देऊन नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुंदडा विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा; शालेय आठवणींना दिला उजाळा

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ सैय्यद इमरान



**मालेगाव :** येथील ना.ना. मुंदडा विद्यालय माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील दहावी २००१-२००२ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा १२ एप्रिल २०२६ रोजी अत्यंत उत्साही व भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल २४ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी 'पुन्हा बालपण जगूया' या भावनेतून शालेय आठवणींना उजाळा दिला.

या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिनेश कुमार उंटवाल होते. तर प्रमुख उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष आशिष मुंदडा हे होते. तसेच माजी प्राचार्य अघमकर, माजी प्राचार्य वसंतराव अवचार, संस्थेचे संचालक अभिषेक मुंदडा, शिक्षक पडघान, सारडा, गुडदे, गजानन कुबडे, रोडे, नेरकर, मुंदडा, काटेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संस्थेचे संचालक अभिषेक मुंदडा यांनी उपस्थित राहून माजी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषणाने झाली. यानंतर उपस्थित सर्व शिक्षक व मान्यवरांना शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना अनेकांचे डोळे पाणावले.

एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत भावनिक क्षण अनुभवले. अनेक वर्षांनी भेट झाल्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून येत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील शिक्षकांसोबत घडलेले प्रसंग, मित्रांसोबत घालवलेले क्षण आणि त्या काळातील अनुभवांची रंगतदार शिदोरी एकमेकांशी शेअर केली. शाळेतून मिळालेले शिक्षण आणि संस्कार यांनी आयुष्याला योग्य दिशा दिली, असे मतही अनेकांनी व्यक्त केले.

शिक्षकांनी शिस्त, संस्कार, शिक्षणाचे महत्त्व व जीवनातील यशस्वी वाटचाल यावर मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या शालेय आठवणी आणि शिक्षकांबद्दलचा आदर व ऋण व्यक्त करत मनोगते सादर केली. स्नेहमेळाव्यात विविध मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत आणली. नृत्य, गाणी, मजेशीर खेळ तसेच 'पुन्हा एकदा शाळेत' या संकल्पनेतून प्रतिकात्मक शाळा भरविण्यात आली. या उपक्रमामुळे उपस्थितांना जणू पुन्हा शालेय जीवन जगत असल्याचा अनुभव मिळाला. कार्यक्रमाच्या शेवटी स्नेहभोजन आणि गप्पांमुळे हा दिवस अविस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमासाठी गिरीश काबरा, डॉ. सचिन चापे, अभिषेक चरखा, डॉ. अनुप सांबपुरे, आशिष जोशी, आनंद गट्टाणी, विजय घुगे, राम भूतडा, सागर अनसिंगकर, शेख अक्रम, शिवाजी बळी, गणेश शर्मा, प्रीती पिंपरकर, सैय्यद इमरान यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा स्नेहमेळावा यशस्वीपणे पार पडला.

✦ दहा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ; ७० हून अधिक महिला, मुलींचा सहभाग

# बुलढाण्यात 'मिशन परिवर्तन'द्वारे नारीशक्तीला स्वसंरक्षणाचे धडे

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत







**बुलढाणा :** महिला आणि मुलींवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर त्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बुलढाणा पोलीस दलाने पुढाकार घेतला आहे. 'मिशन परिवर्तन' अंतर्गत शहरातील म्हाडा कॉलनी परिसरात दहा दिवसीय स्वसंरक्षण प्रात्यक्षिक शिबिराचा गुरुवारी उत्साहात प्रारंभ झाला. यामध्ये लाठीकाठी, दांडपट्टा आणि कराटे यांसारख्या युद्धकलांचे प्रशिक्षण दिले जात आहे.

जिल्हा पोलीस दल, महिला व बालविकास विभाग, विश्वसिंधू बहुउद्देशीय सामाजिक संस्था आणि स्वामीराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे उद्घाटन १६ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख सुनील अंबुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. आजच्या काळात शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायानिमित्त महिलांना घराबाहेर पडावे लागते. अशा वेळी समाजकंटकांकडून होणारे हल्ले किंवा छेडछाडीचा प्रतिकार करण्यासाठी महिलांकडे स्वसंरक्षणाचे कौशल्य असणे अनिवार्य झाले आहे. या शिबिरात सहभागी झालेल्या ७० हून अधिक महिला व मुलींना तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून केवळ शारीरिक डावपेचच नव्हे, तर कठीण प्रसंगात डगमगून न जाता धैर्याने सामोरे जाण्याचे मानसिक बळही दिले जात आहे. म्हाडा कॉलनीतील निसर्गरम्य परिसरात सुरू असलेल्या या प्रशिक्षणाबद्दल सहभागी महिलांनी समाधान व्यक्त केले असून, यामुळे आपला आत्मविश्वास दुणावल्याची भावना व्यक्त केली आहे सामाजिक संस्थांचा पुढाकार

वाढत्या अत्याचाराच्या घटना ही समाजासाठी चिंतेची बाब आहे. हीच बाब ओळखून बुलढाण्यातील सामाजिक संस्थांनी प्रशासनाच्या सोबतीने हा लढा उभारला आहे. विश्वसिंधू आणि स्वामीराज या संस्थांनी पोलीस विभागाच्या 'मिशन परिवर्तन' मोहिमेला बळकटी देत हे शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष श्रम घेतले आहेत. उद्घाटन प्रसंगी तालुका महिला व बाल संरक्षण अधिकारी राम वसु, विश्वसिंधू संस्थेचे अध्यक्ष संदीप वानखेडे, पत्रकार दीपक मोरे, संदीप शुक्ला, निलेश राऊत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गायत्री सावजी यांनी केले, तर आरती मख यांनी उपस्थितांचे आभार मानले. जास्तीत जास्त महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना-घडामोडी





पुस्तक व शस्त्र प्रदर्शनीस लोकांचा प्रचंड प्रतिसाद..

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जिल्हा दौरा

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार दि. 20 एप्रिल 2026 रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सोमवार दि. 20 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता नागपूर येथून शेगाव हेलीपॅड येथे आगमन व संत गजानन महाराज संस्थानकडे प्रयाण. सकाळी 10.15 वाजता श्री संत गजानन महाराज संस्थान येथे दर्शनासाठी राखीव. सकाळी 11 वाजता शेगाव हेलीपॅड येथून चिखलीकडे रवाना. सकाळी 11.30 वाजता चिखली येथील शेरखजी बोंदरे यांच्या शेतातील हेलीपॅडवर आगमन व कार्यक्रम स्थळी प्रस्थान. दुपारी 11.45 वाजता देव्हडे फार्म अॅन्ड अॅग्रो टुरिझमचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी 1 वाजता चिखली हेलिपॅड येथे आगमन व नागपूरकडे प्रयाण करतील.

## पान एक वरून

भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना रनोट यांनी नुकतेच लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावरील चर्चेदरम्यान काँग्रेसवर हल्ला चढवला. गुरुवारी कंगना म्हणाल्या, '2024 मध्ये जेव्हा मला तिकीट मिळालं, तेव्हा माझा एक फोटो लावून आणि त्याच्या खाली काँग्रेसच्या प्रवक्त्याने लिहिलं होतं- मंडीत काय भाव चालला आहे.' त्या म्हणाल्या, 'अध्यक्ष महोदय, मी एक कलाकार आहे. मी राणी लक्ष्मीबाईंसारख्या योद्ध्यापासून ते 'गँगस्टर'मधील भरकटलेली मुलगी, 'फॅशन'मधील ड्रग अॅडिक्ट, 'रज्जो'मधील सेक्स वर्कर आणि 'थलायवी'मधील नेत्यापर्यंत अशा सर्व प्रकारच्या भूमिका केल्या आहेत, ज्यासाठी मला राष्ट्रीय सन्मानही मिळाले आहेत.' त्यांनी पुढे म्हटले, 'एका कलाकाराचा धर्म असतो की त्याने प्रत्येक भूमिकेत पूर्णपणे समरस व्हावे, पण यांनी माझ्या चित्रपटातील भूमिका आणि चित्राचा वापर करून खाली लिहिले, मंडीतील मुलींचे काय भाव आहेत.' कंगना रणौत हिमाचल प्रदेशातील मंडी लोकसभा मतदारसंघातून 2024 पासून भाजपच्या खासदार आहेत. विशेष म्हणजे, 2024 मध्ये 24 मार्च रोजी कंगनाला उमेदवार घोषित केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांच्या इंस्टाग्राम हँडलवरून कंगनाच्या फोटोसोबत लिहिले होते, 'मंडीमध्ये काय भाव सुरू आहे, कोणी सांगेल का.'

# चिखली पोलिसांची मोठी कामगिरी; २.३० लाखांचे १९ मोबाईल हस्तगत

बातमी जगत | प्रतिनिधी



**चिखली :** शहर व परिसरात गेल्या काही काळापासून मोबाईल हरविल्याच्या वाढत्या तक्रारींना गांभीर्याने घेत चिखली पोलिसांनी प्रभावी कारवाई करत तब्बल २ लाख ३० हजार रुपये किमतीचे १९ मोबाईल शोधून काढण्यात यश मिळवले आहे. ठाणेदार भूषण गावंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी बजावली. हस्तगत करण्यात आलेले मोबाईल संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

चिखली पोलिस स्टेशन हद्दीत मोबाईल गहाळ होण्याच्या घटना वाढत असल्याने पोलिस प्रशासनासमोर हे एक गंभीर आव्हान बनले होते. या पार्श्वभूमीवर ठाणेदार भूषण गावंडे यांनी विशेष पथक स्थापन करून या पथकाला हरविलेले मोबाईल शोधण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. या पथकात पोलिस अंमलदार विजय किटे , सुनील राजपूत, निलेश सावळे तसेच महिला पोलिस अंमलदार रुपाली उगले यांचा समावेश होता. पथकाने विविध ठिकाणी मिळालेल्या माहितीसोबतच तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत वेगवेगळ्या कंपन्यांचे एकूण १९ मोबाईल हस्तगत केले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये रिअलमी, ओप्पो रेनो, रेडमी नोट ८, सॅमसंग, रिअलमी नार्झो, व्हिवो, वन प्लस, व्हिवो वाय १६ आदी कंपन्यांच्या मोबाईलचा समावेश आहे. या मोबाईलची स्वतंत्र किंमत ५ हजार रुपयांपासून २८ हजार रुपयांपर्यंत असून सर्व मोबाईलची एकूण किंमत २ लाख ३० हजार रुपये इतकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हरविलेल्या वस्तूंचा शोध घेऊन त्या मूळ मालकांच्या ताब्यात देणे हे पोलिसांसाठी विश्वासार्हतेचे काम मानले जाते आणि चिखली पोलिसांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडल्याचे या कारवाईतून दिसून आले. विशेष म्हणजे, या कारवाईमुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयीचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. मोबाईल हरवल्यानंतर तो परत मिळण्याची शक्यता कमी असते, अशी सर्वसामान्य धारणा असताना चिखली पोलिसांनी योग्य नियोजन आणि समन्वयाच्या बळावर ती मोडून काढली आहे. त्यामुळे पोलिसांच्या दक्षतेचे आणि कार्यकौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई मा. पोलिस अधीक्षक श्री. निलेश तांबे, मा. अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, मा. उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलिस निरीक्षक भूषण गावंडे, पोहेकॉ शरद भागवतकर, पोहेकॉ विजय किटे, पोकॉ सुनील राजपूत, मपोकॉ रुपाली उगले तसेच तांत्रिक विश्लेषण विभाग, बुलढाणा येथील पवन मखमले आणि कैलास ठोंबरे यांनी मोलाचे सहकार्य केले. चिखली पोलिसांची ही कारवाई केवळ गुन्हे उघडकीस आणणारी नाही, तर नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पोलिस दल किती तत्परतेने काम करत आहे, याचे उत्तम उदाहरण ठरत आहे. रिअलमी, ओप्पो रेनो, रेडमी नोट ८, सॅमसंग, रिअलमी नार्झो, व्हिवो, वन प्लस, व्हिवो वाय १६ आदी कंपन्यांचे एकूण १९ मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले.

## शेतकऱ्याची यशोगाथा;११गुंठे शेतात २लाख ५०हजाराचे उत्पन्न

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ संदिप पळसकर



**डोणगाव :** कमी क्षेत्रातही योग्य नियोजन, मेहनत आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर केल्यास भरघोस उत्पन्न मिळू शकते, याचा उत्तम आदर्श डोणगाव येथील प्रगतशील शेतकरी वैभव नव्हाळे यांनी घालून दिला आहे.

अवघ्या ११ गुंठे शेतीत त्यांनी तब्बल २ लाख ५० हजार रुपयांचे उत्पन्न मिळवत परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. योग्य पीक निवड, वेळेवर खत व पाण्याचे व्यवस्थापन, तसेच बाजारपेठेचा अचूक अभ्यास यामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. वैभव नव्हाळे यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत आधुनिक पद्धतींचा अवलंब केला. कमी क्षेत्रात जास्त उत्पादन घेण्यासाठी त्यांनी सूक्ष्म सिंचन, सेंद्रिय खतांचा वापर आणि कीड नियंत्रणाच्या योग्य उपाययोजना राबवल्या. यामुळे उत्पादनाचा दर्जा सुधारला आणि बाजारात चांगला भाव मिळाला. त्यांच्या या यशामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले असून, कमी जमिनीतही योग्य नियोजन केल्यास शेती फायदेशीर ठरू शकते, हा संदेश त्यांनी दिला आहे. शासनाने अशा प्रगतशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या अनुभवाचा इतरांना फायदा करून देणे गरजेचे असल्याची मागणीही व्यक्त होत आहे.

## बोरी येथे लवकरच 'अप्पर तहसील'ची निर्मिती; पालकमंत्र्यांचे आश्वासन



बातमी जगत | प्रतिनिधी

✦ मनोज टाक

**बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे पहिल्या टप्प्यात, तर चारठाणा येथे दुसऱ्या टप्प्यात अप्पर तहसील कार्यालय लवकरच साकारणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन पालकमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी दिले.

बुधवारी सतीशराव चौधरी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेऊन ही मागणी केली. यावेळी भाजपाचे डॉ. पंडितराव दराडे, नगरसेवक शेख अथर, विलास भंडारे उपस्थित होते. पालकमंत्र्यांच्या या घोषणेमुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. सतीशराव चौधरी, आत्माराम पवार, संतोषराव चौधरी, डॉ. सुरेश खापरे, ओमकार चौधरी, यमाजीराव ईप्पर, गजानन चौधरी, विठ्ठलराव शिंदे, अॅड. सुरेश चौधरी, डॉ. किरण बकान, डॉ. भगवान ढगे, डॉ. केशव जावळे, अनुप गोरे, भास्करराव टाक, भारत जोशी, लोभान खसाब, पाशा कुरेशी, रहीम पठाण, रामा चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, प्रसादराव गोरे, उत्तमराव डोंबे, सुनील झंवर, विकास काळे, गोपाळ बिर्ला, प्रकाश देशमुख, नाना घोरपडे, केशवराव टाक व उत्तमराव डोंबे यांच्यासह या शिष्टमंडळात अनेक जन सहभागी झाले होते.

## लोणारच्या विद्यार्थ्यांचे कलर बेल्ट कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ गजानन तुपकर

**लोणार :** महाराणा तायक्वांदो कराटे अकॅडमी, लोणार यांच्या वतीने आयोजित कलर बेल्ट कराटे स्पर्धेत लोणारच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत फौजिया नवरंगाबादी, अर्णवी आठवले, रुद्र मोरे, सोमनाथ बोडखे यांनी ग्रीन बेल्ट प्राप्त केला. तसेच शिव शिंदे, अधिराज मापारी, विवान बोरा, विराज बोरा, वैभवी मोरे, अद्विक मापारी, अर्पिता कळसरे, आर्यन मापारी, काव्या शिवणकर यांनी यलो बेल्ट मिळवला. एकांत संतोष राठोड, भूमिका सानप, श्वेता नरोटे, श्रिया नरोटे, समीक्षा झिने, राजनंदनी मोरे यांनी ब्लू बेल्ट प्राप्त करून यश मिळवले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांकडून काता, कुमिते, पंचिंग, ब्लॉकिंग, किकिंग, नानचाकू, काठी फिरवणे तसेच रोड फाईट यांसारख्या विविध कौशल्यांचे सादरीकरण करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपापल्या गटात बेल्ट श्रेणी मिळवली. या यशामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह शाळा, गाव व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच या यशस्वी विद्यार्थ्यांची मुंबई येथे मे महिन्यात होणाऱ्या कलर बेल्ट कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना मुख्य कराटे प्रशिक्षक संतोष जाधव, कराटे प्रशिक्षिका चंचल दाते व प्रशिक्षक आर्यन वानखडे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास इरतकर सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून पीएसआय राजेश घोगरे व महसूल अधिकारी संतोष राठोड उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## करवंड महोत्सवात शिवसंस्कृतीचा जागर; ३७० व्या शिवराज-गुणवंताबाई विवाह सोहळ्याची भव्य स्मृती

बातमी जगत | प्रतिनिधी



**चिखली :** मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील ऐतिहासिक करवंड येथे आयोजित करण्यात आलेला ऐतिहासिक करवंड महोत्सव यंदा अत्यंत भव्य आणि दिमाखदार पद्धतीने पार पडला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा आणि करवंड महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा संपन्न झाला.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी गुणवंताबाई साहेब यांच्या ३७० व्या विवाह सोहळ्याच्या स्मृती जागरणानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रम. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा अभिषेक करून शिवरायांना अभिवादन करण्यात आले. राज्यभरातील नामवंत शाहीर, कलाकार आणि कलावंतांनी पोवाडे, गोंधळ, जोगवा, कोळीगीत आणि दिंडी सोहळ्यांच्या माध्यमातून शिवचरित्र जिवंत केले. ऐतिहासिक व्याख्यान आणि नाट्यरूप सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. प्रसिद्ध इतिहासकार व शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानातून शिवरायांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग उलगडले, ज्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या भव्य कार्यक्रमाचे उद्घाटन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री मकरंद आबा पाटील, सहपालकमंत्री संजय सावकारे, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, आमदार आकाश फुंडकर यांच्यासह मराठा सेवा संघाचे शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर, इंगळे घराण्याचे वंशज हरिरुद्र प्रतापरुद्र माने-इंगळे तसेच जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या महोत्सवाला आमदार सिद्धार्थ खरात यांनीही हजेरी लावली असून त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत शिवसंस्कृती जपण्याची गरज अधोरेखित केली. बावन बुर्जी ऐतिहासिक वारसा लाभलेल्या करवंड गावाला या महोत्सवामुळे नवसंजीवनी मिळाली असून हा सोहळा शिवसंस्कृतीचा जागर आणि इतिहासाचा अभिमान जागवणारा ठरला.

# मस्तकात विचारांची 'पेरणी' अन् संविधानाचा काळजातून 'जागर'!

### अंधश्रद्धेच्या अंधारावर विवेकाचा प्रहार; डॉ. शाम मुडे यांनी फुंकले परिवर्तनाचे रणशिंग, महामानवांच्या स्वप्नातील भारतासाठी शिक्षणाचे 'शस्त्र' उचला!, डीवायएसपी संतोष खाडे , गावाच्या विकासासाठी सेवा संघ कटिबद्ध : दि. स. अंभोरे

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ कैलास राऊत










**देऊळगाव माळी :** "महामानवांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्य वेचले, ती मूल्ये केवळ इतिहासाच्या पानांवर न राहता ती आपल्या सुपीक मस्तकात पेरली गेली पाहिजेत. जोपर्यंत कष्टकरी आणि वंचितांची मुले शिक्षणाचे शस्त्र हाती घेऊन सत्तेच्या आणि ज्ञानाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचत नाहीत, तोपर्यंत खऱ्या अर्थाने क्रांती घडणार नाही," असा सूर देऊळगाव माळी येथील प्रबोधन सोहळ्यात उमटला. निमित्त होते 'सेवानिवृत्त सेवा संघा'च्या वतीने आयोजित महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीनिमित्त जाहीर व्याख्यानाचे.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांनी तरुणांना प्रोत्साहित करताना संविधानाची महती विषद केली. "आज मी जो तुमच्यासमोर अधिकारी म्हणून उभा आहे, ते केवळ डॉ. बाबासाहेबांच्या संविधानामुळे. संविधानातील कलम १४ ते ३५ मधील मूलभूत हक्कांच्या ताकदीमुळेच गावखेड्यातील सामान्य मुले आज मोठी स्वप्ने पाहू शकत आहेत. तरुणांनी केवळ मिरवणुकांमध्ये न रमता शिक्षणाचे शस्त्र हाती घेऊन स्वतःचे भविष्य उज्ज्वल करावे," असे प्रतिपादन त्यांनी केले. मुख्य व्याख्याते प्रा. डॉ. शाम मुडे यांनी संत साहित्य आणि संविधान यांची सांगड घालत उपस्थितांची मने जिंकली. "संत तुकाराम महाराजांनी ज्याप्रमाणे 'निर्मळ चित्ताने' जगण्याचा संदेश दिला, तोच समतेचा विचार संविधानाने आपल्याला दिला आहे," असे ते म्हणाले. 'संविधान दयाला जाणून घेई' असे म्हणत त्यांनी अंधश्रद्धा आणि व्यसनांपासून दूर राहून विवेकवादी समाज घडवण्याचे आवाहन केले. त्यांच्या साहित्यिक आणि मार्मिक शैलीने संपूर्ण परिसर वैचारिक ऊर्जेने भरून गेला होता. अध्यक्षस्थानावरून बोलताना सेवानिवृत्त सेवा संघाचे संकल्पक तथा सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता दि. स. अंभोरे यांनी आगामी ध्येयधोरणे स्पष्ट केली. "केवळ निवृत्तीनंतर विश्रांती न घेता, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक ऋणातून मुक्त होण्यासाठी आमचा सेवा संघ भविष्यातही पूर्ण ताकदीने कटिबद्ध राहील," अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी 'संविधान जागर'चे तुषार माऊली व त्यांच्या संचाने प्रबोधन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी जमधाडे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रा. अनिल कलोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सेवानिवृत्त शाखा अभियंता नारायण बळी, संपादक कैलास राऊत, शिवाजी जमधाडे, हरीभाऊ भराड,यांच्यासह सेवा संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने या ऐतिहासिक सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी परिसरातील नागरिक, माता-भगिनी आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## घटना -घडामोडी

### भागवत इरतकर यांना स्व. रा.गो. टाकळकर गुरुजी स्मृती संगीत सेवा पुरस्कार जाहीर

बातमी जगत | प्रतिनिधी



बुलढाणा : चिखली येथील प्रथितयश शिक्षक विवेकानंद शिकवणी वर्गाचे संचालक भागवत इरतकर यांना 2026 चा स्वातंत्र्य सैनिक स्व. रमेशराव भाऊराव पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारा स्व. रा.गो. टाकळकर गुरुजी स्मृती संगीत सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे. भागवत इरतकर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील कार्यास सोबतच चिखली शहरातील सांगितिक वातावरण समृद्ध करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत स्वरसाधना संगीत विद्यालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या संगीत सेवा पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आल्याचे अरविंद टाकळकर व मिना गणेशराव पाटील यांनी एका पत्रकाव्दारे कळविले आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रुपये 5000 व स्मृतिचिन्ह शाल असे असते. गेल्या 21 वर्षापासून चिखली शहरात मराठी नववर्षाचे स्वागत करतांना गुढीपाडव्याच्या दिवशी पाडवा पहाट कार्यक्रमाचे आयोजन भागवत इरतकर यांच्या पुढाकाराने केले जाते. मराठी संस्कृती व परंपरा जतन करत असतांनाच संगीत क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या व नवोदित कलाकारांनाही पाडवा पहाटच्या माध्यमातून त्यांनी आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली. चिखली शहरात शास्त्रीय संगीता सोबतच सुगम संगीत,, नाट्य संगीत भक्ती गीत, भावगीत या कलाक्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या अनेक कलाकारांना बोलवून चिखलीकरांना दरवर्षी सांगितिक मेजवानी उपलब्ध करून दिली. चिखली शहरासोबतच जिल्ह्यातील संगीत रसिकांना घडवण्याचे कार्य भागवत इरतकर यांनी केले आहे. या कार्याची दखल घेत त्यांना यावर्षीचा स्व. रा.गो. टाकळकर गुरुजी संगीत सेवा पुरस्कार दिनांक 28 एप्रिल 2026 रोजी स्व. रा.गो. टाकळकर गुरुजी स्मृति संगीत समारोहात बुलडाणाच्या गोवर्धन सभागृहात सांयकाळी ७ वाजता मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी बुलढाणा शहर व परिसरातील संगीत रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन स्वर साधना संगीत विद्यालयाच्या,वतीने करण्यात आले आहे

### पेणमध्ये रस्ता सुरक्षा अभियानाचा दिमाखदार समारोप.

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर



**पेण :** 'स्वयंशिस्त हाच रस्ता सुरक्षेचा सर्वोत्तम उपाय' हा संदेश देत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण-रायगडच्या वतीने आयोजित रस्ता सुरक्षा अभियान २०२६चा समारोप बुधवारी उत्साहात पार पडला. रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकूल उप प्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी व सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी विष्णू घोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अभियानाचे विशेष आकर्षण ठरलेल्या रील स्पर्धेतील विजेत्यांना १५ हजार, १० हजार व ५ हजार रुपयांची पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट सेवा देणारे रिक्षाचालक, मिनिडोर चालक आणि स्कूल बस चालकांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. या अभियानामुळे जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आरटीओ कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

✦ ७०९ वी पुण्यतिथी साजरी; शास्त्रोक्त पद्धतीने सकाळीच पार पडला कार्यक्रम

# धुळ्यात ब्रिटिशकालीन कुंभार खुंटावर संत गोरोबा काकांना अभिवादन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ अनिल चित्ते





**धुळे :** धुळे जिल्हा कुंभार समाज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किशोर कुंभार व उपाध्यक्ष दिनेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संत शिरोमणी गोरोबा काका यांची ७०९ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. १५ एप्रिल रोजी जुन्या धुळ्यातील सुभाष नगर येथील संत शिरोमणी गोरोबा काका चौक परिसरात असलेल्या ब्रिटिशकालीन कुंभार खुंटावर हा अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

पुण्यतिथी म्हणजेच स्मृतीदिन हा संतांच्या स्मरणाचा आणि आदरांजलीचा दिवस असल्याने, कुंभार समाज बांधवांनी सकाळी गोरोबा काकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या चरणी नतमस्तक होत स्मरण केले. पुण्यतिथीच्या दिवशी शांततामय आदरांजली वाहणे हीच संत परंपरा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मात्र, दुसरीकडे समाजातील काही स्वयंघोषित पुढारी आणि पदाधिकाऱ्यांनी पुण्यतिथीचा कार्यक्रम संध्याकाळी साजरा केल्याने, त्यांना जयंती आणि पुण्यतिथीमधील फरक अद्याप कळला नसल्याची चर्चा समाजबांधवांमध्ये रंगली होती. जयंती हा जन्माचा आनंदोत्सव असतो, तर पुण्यतिथी सकाळीच साजरी करण्याचे शास्त्र असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर, संस्थेचे सचिव तथा पत्रकार अनिल चित्ते यांनी जुन्या परंपरेला फाटा देत सकाळी ९ वाजता शास्त्रोक्त पद्धतीने हा कार्यक्रम घडवून आणला. बुरझडचे सुपुत्र आणि भारतीय सैन्यात ३५ वर्षे देशसेवा करून निवृत्त झालेले सुभेदार विनोद भिका चित्ते यांच्या शुभहस्ते गोरोबा काकांची विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ नेते शांताराम लालाजी चव्हाण, ज्योतीताई शांताराम चव्हाण, राजमल लालाजी चव्हाण, सुनंदाताई राजमल चव्हाण, संजय जगन्नाथ चव्हाण, सरिता संजय चव्हाण, अनिल सीताराम मोरे, ज्योती अनिल मोरे यांनी सपत्निक पूजन करून आशीर्वाद घेतले. गणेश बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष मूर्तिकार राजेंद्र चित्ते यांनी उपस्थितांना प्रसाद वाटप केले.

याप्रसंगी उत्तमराव आनंदा चव्हाण, सुरेश त्र्यंबक मोरे (सेंधवा), लक्ष्मणराव बोरसे, जगन्नाथराव बुधा चव्हाण, जगदीश मंगळकर सर, रामकृष्ण वाघ, गोकुळ चित्ते, विलासभाऊ मोरे, प्रविणभाऊ धाडे, इंजि. गोपाल वाघ, सचिनभाऊ बच्छाव, सागरभाऊ वाघ, ऋषिकेश सोनवणे, प्रशांत चव्हाण उर्फ आबा, नारायणभाई जगदाळे, ॲड. पंकज वाघ, गिरीशभाऊ चव्हाण, इंजि. अक्षय चव्हाण, विशाल चव्हाण, नानाभाऊ परदेशी, दिपक बोरसे, विजय चित्ते, राकेश वाघ, मनोज सोनवणे, भारत बोरसे, दिनेश बोरसे, गोटू चव्हाण, मल्हारी चव्हाण, भटू चव्हाण, राजेश पंडित चव्हाण, गौरव चव्हाण, दुर्गेश उर्फ गोलू चव्हाण, बापू चव्हाण, भूषण चव्हाण उपस्थित होते.

जुन्या धुळ्यातील ज्येष्ठ मंडळी, महिला आणि तरुणांनी या कार्यक्रमासाठी मोठे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्भीड पत्रकार अनिल चित्ते यांनी केले, तर आभार गिरीश चव्हाण यांनी मानले.

## बोरी येथे लवकरच 'अप्पर तहसील'ची निर्मिती; पालकमंत्र्यांचे आश्वासन

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ मनोज टाक



**बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथे पहिल्या टप्प्यात, तर चारठाणा येथे दुसऱ्या टप्प्यात अप्पर तहसील कार्यालय लवकरच साकारणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन पालकमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी दिले.

बुधवारी सतीशराव चौधरी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेऊन ही मागणी केली. यावेळी भाजपाचे डॉ. पंडितराव दराडे, नगरसेवक शेख अथर, विलास भंडारे उपस्थित होते. पालकमंत्र्यांच्या या घोषणेमुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. सतीशराव चौधरी, आत्माराम पवार, संतोषराव चौधरी, डॉ. सुरेश खापरे, ओमकार चौधरी, यमाजीराव ईप्पर, गजानन चौधरी, विठ्ठलराव शिंदे, ॲड. सुरेश चौधरी, डॉ. किरण बकान, डॉ. भगवान ढगे, डॉ. केशव जावळे, अनुप गोरे, भास्करराव टाक, भारत जोशी, लोभान खसाब, पाशा कुरेशी, रहीम पठाण, रामा चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, प्रसादराव गोरे, उत्तमराव डोंबे, सुनील झंवर, विकास काळे, गोपाळ बिर्ला, प्रकाश देशमुख, नाना घोरपडे, केशवराव टाक व उत्तमराव डोंबे यांच्यासह या शिष्टमंडळात अनेक जन सहभागी झाले होते.

## पिक विमा न मिळाल्याने संताप उफाळला; शेतकरी योद्धा कृती समिती आक्रमक, १ मे 'काळा दिवस'चा इशारा

बातमी जगत | प्रतिनिधी



**लोणार :** मागील 2025 च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शासनाने नुकसान मान्य करून काही प्रमाणात मदत दिली असली, तरी पिक विमा अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून या प्रश्नावर शेतकरी योद्धा कृती समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर समितीचे संस्थापक अध्यक्ष बालाजी सोसे यांनी पिक विमा कंपन्यांना थेट इशारा दिला आहे. दिनांक 29 एप्रिल 2026 पर्यंत लोणार, सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विमा न मिळाल्यास सिंदखेडराजा येथील उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्यात येणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. इतकेच नव्हे, तर शासन व प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास 1 मे महाराष्ट्र दिन 'काळा दिवस' म्हणून पाळण्यात येईल, असा तीव्र इशाराही देण्यात आला आहे. यामुळे प्रशासनावर दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, या आंदोलनाला बळ देण्यासाठी शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक उपाध्यक्ष रघुनाथ आघाव यांनी लोणार तहसीलदार यांच्या माध्यमातून राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले आहे. या पत्राद्वारे बालाजी सोसे यांच्या उपोषणाला पूर्ण पाठिंबा दर्शविण्यात आला असून, पिक विमा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असताना प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## माफसू मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ प्रवीण बागडे



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर येथे कास्ट्राईब कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) तर्फे उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी विद्यापीठ मुख्यालयातील बाबासाहेबांच्या पूर्णाकृती तैलचित्राला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. शिरीष उपाध्ये (संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता पशुविज्ञान), डॉ. नितीन कुरकुरे (संचालक संशोधन), डॉ. सचिन बोन्डे (संचालक विस्तार शिक्षण), डॉ. भूषण रामटेके (अधिष्ठाता निम्न शिक्षण), श्रीमती मनिषा शेंडे (नियंत्रक), ईंजि. प्रमोद तायडे (विद्यापीठ अभियंता) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच डॉ. जयंत कोरडे, डॉ. नरेश नंदेश्वर, डॉ. अजय गावंडे, डॉ. वकार खान, डॉ. अतुल ढोक, डॉ. संजय गोडबोले, दिनेश पाटील, डॉ. गिरीधर शेंडे, डॉ. महेश जावळे, डॉ. प्रज्ञेय ताकसांडे (अध्यक्ष, कास्टट्राइब मपमविवि कर्मचारी संघटना), डॉ. गीतांजली ढुमे, रामराव किर्तने, अजय खुटाटे, निरज कुरळकर, जालिंदर गजभारे, प्रवीण बागडे (उपाध्यक्ष, कास्टट्राइब मपमविवि कर्मचारी संघटना), जितेंद्र हातमोडे (सचिव), संतोष बनसोड (कोषाध्यक्ष) यांचीही उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठातील विस्तार शिक्षण संचालनालय, परीक्षा नियंत्रक कार्यालय तसेच वाहन चालक कक्ष येथेही बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या सामाजिक समता, न्याय आणि शिक्षणाच्या तत्वज्ञानाचा गौरव केला.

# खामगाव-जालना रेल्वे मार्गाची 'क्रेझ'; लवकरच मिळणार 'गुड न्यूज'!

### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा; अंतिम मंजुरीसाठी हालचाली वेगवान



> ✦ बुलढाणा जिल्ह्याच्या प्रलंबित रेल्वे प्रश्नासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी झालेली चर्चा अतिशय सकारात्मक झाली असून, लवकरच जिल्ह्याला या रेल्वे मार्गाच्या रूपाने मोठी भेट मिळेल."
>
> ✦ - प्रतापराव जाधव
>
> ✦ केंद्रीय राज्यमंत्री, भारत सरकार.*

बातमी जगत | प्रतिनिधी

**बुलढाणा :** बुलढाणेकरांचे अनेक दशकांचे स्वप्न असलेल्या खामगाव-जालना रेल्वे मार्गाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला असून, या संदर्भातील अंतिम मंजुरीची 'गोड बातमी' लवकरच मिळणार आहे. केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन या प्रकल्पावर सविस्तर चर्चा केली. रेल्वे मंत्र्यांनी यासंदर्भात अत्यंत सकारात्मकता दर्शवल्याने जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळण्याची चिन्हे आहेत.

मध्य आणि दक्षिण-मध्य रेल्वेला जोडणारा हा प्रकल्प जिल्ह्यासाठी 'लाईफलाईन' ठरणार आहे. या रेल्वे मार्गासाठी लागणाऱ्या एकूण खर्चापैकी ५० टक्के वाटा उचलण्यास राज्य सरकारने आधीच मान्यता दिली असून, अर्थसंकल्पात तशी तरतूदही केली आहे. राज्य सरकारचा प्रस्ताव आता केंद्र सरकारकडे असून, केंद्राचा ५० टक्के हिस्सा मिळवण्यासाठी प्रतापराव जाधव यांचा दिल्लीत जोरदार पाठपुरावा सुरू आहे. रेल्वे मंत्रालयाने हा प्रस्ताव आता अंतिम मान्यतेसाठी अर्थ मंत्रालयाकडे पाठविला आहे. तिथे तांत्रिक आणि आर्थिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर अधिकृत घोषणा केली जाणार आहे. या रेल्वे मार्गामुळे जालना आणि खामगाव ही दोन मोठी व्यापारी शहरे एकमेकांशी जोडली जाणार असून, उद्योग व रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. २००९ मध्ये पहिल्यांदा लोकसभेत गेल्यानंतर प्रतापराव जाधव यांनी या रेल्वे मार्गासाठी सातत्याने आवाज उठवला. लोकसभेच्या प्रत्येक अधिवेशनात या प्रश्नावर चर्चा घडवून आणल्यामुळेच प्रथम रेल्वे सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आणि त्यानंतर हा मार्ग 'पुंजी निवेश' कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आला. केंद्राची तत्त्वतः मान्यता मिळवण्यात त्यांना यश आले असून, आता शेवटचा टप्पा पार पडत आहे.

खुश खबर...! खुश खबर...! खुश खबर...! खुश खबर...! खुश खबर...!

FREE DEMO...!

**स्पाईन मॅनेजमेंट**

FREE DEMO...!

किडनी खराब होणे, लिव्हर, ब्रेन, हार्ट, पॅरालिसिस, ब्लॉकेजेस, B.P., Sugar, Thyroid, Acidity, अस्थमा, डायजेशन प्रॉब्लम, चरबी किंवा ब्लडच्या गाठी, गठीया, वात, गुडघे, कंबर, स्पॉंडिलिसिस, कॅन्सर सारखे प्रॉब्लम, अपेंडिक्स, किडनी स्टोन, पित्ताशयाचे प्रॉब्लम, प्रोस्टेड प्रॉब्लम, युरीन प्रॉब्लम, मुळव्याध, फंगल इंफे क्शन, सोरायसिस, त्वचारोग, व्हेरीकोस व्हेन्स, सायटिका पिरियड्स प्रॉब्लम, P.C.O.D. समस्या, गर्भाशयाचे प्रॉब्लम, आई न बनणे, लेडिज आणि जेंट्स चे पर्सनल प्रॉब्लम हे सर्व प्रॉब्लम ठिक करण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे NUGA BEST. WITHOUT ऑपरेशन मेडिकल आणि WITHOUT साईट इफेक्ट शिवाय तुम्ही तुमच्या शरीराला हेल्दी ठेवशकता



Mob 9699418692

वेळ :- सोमवार ते शुक्रवार, सकाळी 8.00 ते सायं. 4.00 वाजेपर्यंत
शनिवार, स. 8.00 ते 12.00 वाजेपर्यंत (रविवार बंद राहील.)

एक वेळ अवश्य भेट द्या. FREE DEMO

www.nugaindia.in (Toll Free 18002669901)

पत्ता - १ ला मजला, गायकवाड कॉम्प्लेक्स, मथुरा हॉस्पिटल समोर, चिखली रोड, मेहकर.जि. बुलढाणा